# पाडीदम गावात 10 महिन्यांपासून ऑनलाईन जन्म-मृत्यू प्रमाणपत्र सेवा ठप्प

## आदिवासी नागरिक त्रस्त

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.23 )** – चटवाबोड ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या पाडीदम गावातील नागरिकांना गेल्या दहा महिन्यांपासून ऑनलाईन जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र मिळत नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या सेवेअभावी गावातील गरीब आदिवासी नागरिकांची




शासकीय कामे अडकल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

शालेय प्रवेश, सरकारी योजना, रेशन कार्ड, आधार कार्ड, आरोग्य योजना यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी जन्म प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र, ऑनलाईन प्रणालीवरून पाडीदम गावाचे नाव वगळण्यात आल्यामुळे ही सेवा मिळत नाही. या समस्येमुळे गावकऱ्यांना अतिरिक्त खर्च आणि वेळ वाया घालवत परगावी जावे लागत आहे.

गावकऱ्यांनी यासंदर्भात गटविकास अधिकारी विजय गायकवाड यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, पंधरा दिवस उलटून गेले तरी परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही.

अखेर त्रस्त नागरिकांनी आमदार केवलराम काळे यांच्याकडे लेखी मागणी केली. यावर तात्काळ प्रतिक्रिया देत आमदार काळे यांनी गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांना त्वरीत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

पाडीदम गावातील नागरिकांनी शासनदरबारी ही सेवा लवकर सुरू करून त्यांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

# जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन तत्काळ टाका

## टाकरखेडा संभु येथील उपसरपंचांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली ( दि. 23 )** – भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु गावात जलजीवन मिशन अंतर्गत 50 हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात आला आहे. मात्र, या जलकुंभावर अद्याप पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे गावातील पाणीपुरवठा खोळंबला असून नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रदीप महादेवराव शेंडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वीय सहाय्यक राजेश चौखडे यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने पाईपलाईन टाकण्याची मागणी केली आहे. उपसरपंचांनी निवेदनात नमूद केले की, गेल्या वर्षभरापासून जलकुंभ पूर्ण



पाईपलाईनचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, जेणेकरून गावातील नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणी मिळू शकेल,

**प्रदीप शेंडे,**
**उपसरपंच, टाकरखेडा संभू.**

असून, तो 105 गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचा भाग आहे. मात्र, एमडीआर (मुख्य वितरण रेषा) मंजूर असूनही प्रत्यक्षात पाईपलाईनचे काम सुरू झालेले नाही. प्रशासनाच्या अनेक आढावा बैठकीत हा विषय मांडण्यात आला असतानाही अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. निवेदन सादर करताना चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, ग्रामस्थ आणि विविध पदाधिकारी उपस्थित होते. आता प्रशासन या मागणीची दखल घेऊन तातडीने कार्यवाही करते का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## अल्पसंख्याक उमेदवारांसाठी मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )**– अल्पसंख्याक समाजातील तरुणांना पोलीस भरतीसाठी तयार करण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी 25 जुलै रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह जोग स्टेडियम, मालटेकडी रोड, अमरावती येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. या योजनेत मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी, जैन आणि ज्यू या समाजातील 18 ते 25 वयोगटातील उमेदवार अर्ज करू शकतात. मागासवर्गीय उमेदवारांना शासन नियमानुसार वयोमर्यादेत सवलत आहे. उमेदवाराचे वार्षिक उत्पन्न 8 लाख रुपयांपेक्षा कमी असावे. बारावी उत्तीर्ण, शारीरिकदृष्ट्या सक्षम, आणि महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

# स्वच्छतेसह वाहतूक व्यवस्था, नागरी सुविधेवर कटाक्ष!

## आयुक्त सौम्या शर्मा यांची इतवारा बाजार व टाऊन हॉल परिसराची पाहणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )**– अमरावती शहरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज सकाळी 8 वाजता इतवारा बाजार व नेहरू मैदान परिसरातील टाऊन हॉल येथे पाहणी दौरा केला. या पाहणीवेळी विविध विभागांचे अधिकारीही उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आयुक्तांनी इतवारा बाजारातील रस्ते, पथदिवे, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा संकलन आदींची सविस्तर पाहणी केली. व्यापाऱ्यांनी यावेळी स्वच्छता व वाहतूक अडचणींबाबत माहिती दिली. आयुक्तांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.प्रत्येक दुकानदाराने डस्टबिन बाळगणे बंधनकारक असून, अनधिकृत शेड, खोके व ताडपत्री हटवण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले. बाजार परिसरात नियोजित पार्किंग जागा निश्चित करून प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले. परिसरातील शौचालये तत्काळ दुरुस्त करण्याचा आदेशही त्यांनी दिला.



### टाऊन हॉलच्या पुनरुत्थानाचा आढावा

नेहरू मैदान परिसरातील टाऊन हॉलची पाहणी करताना आयुक्तांनी इमारतीच्या सध्याच्या स्थितीचा व भविष्यातील उपयोगाचा आढावा घेत पुनरुत्थानाबाबत सादरीकरण सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. रस्त्याच्या दुतर्फा होणाऱ्या अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक विस्कळीत होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आयुक्तांनी त्वरित कारवाईचे आदेश दिले. फुटपाथ व रस्त्यांवरील अतिक्रमण तातडीने हटवण्याचेही निर्देश देण्यात आले. पादचाऱ्यांसाठी मोकळा रस्ता मिळावा यासाठी दुकानदारांनी रस्त्यावर माल ठेवू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

### स्वच्छता जनजागृतीसाठी विशेष मोहीम

बाजारात नियमित स्वच्छता, वेळेवर कचरा संकलन व घनकचरा व्यवस्थापनासाठी जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. वाहतूक सुधारण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय ठेवण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. स्वच्छ, सुंदर आणि सुटसुटीत अमरावती हे आपले सामूहिक ध्येय आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले. यावेळी शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, पशुचिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, बाजार परवाना विभागाचे दीपक खडेकार, उपअभियंते सुहास चव्हाण, प्रमोद इंगोले, आशिष अवसरे, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथकप्रमुख योगेश कोल्हे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## महिला कर्मचाऱ्याचे केला विनयभंग

**अमरावती** – मार्टच्या मालकाने एका महिला कर्मचार्याचा विनयभंग केला. ही घटना फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत 20 जुलै रोजी उघडकीस आली. पीडित महिला ही एका मार्टमध्ये काम करते. ती कामावर असताना मालक भावेश पोपट (55) याने तिला मोबाइलवर कॉल करून आल्या कॅबिनमध्ये बोलावले. त्यानुसार ती कॅबिनमध्ये गेली. त्यावेळी भावेशने त्यांच्यासोबत असभ्य वर्तन करून विनयभंग केला.

# अल्पसंख्याक उमेदवारांसाठी मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण

## 25 जुलैला अर्ज सादरीकरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 )** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी, जैन व ज्यू समाजातील 18 ते 25 वयोगटातील युवक-युवतींसाठी मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सन 2025-26 साठी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती या संस्थेची निवड करण्यात आली आहे.

प्रशिक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वार्षिक उत्पन्न 8 लाखांपेक्षा जास्त नसावे. महिलांसाठी 30% जागा राखीव असून उंची, छाती, शैक्षणिक पात्रता आणि अधिवास यासंबंधी नियम लागू राहतील. प्रशिक्षण कालावधी तीन महिन्यांचा असून दररोज वर्ग व मैदानी प्रशिक्षण घेतले जाईल. प्रशिक्षणार्थींना गणवेश, साहित्य, जेवण व नाश्ता यांसह सर्व सुविधा मोफत पुरविल्या जातील. इच्छुक उमेदवारांनी 25 जुलै रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत जोग स्टेडियम, मालटेकडी रोड, अमरावती येथे आवश्यक कागदपत्रांसह हजर रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# गाथेच्या गजरात श्रावणाचा प्रारंभ सावंगा नगरीत भक्तिभावाची मांदियाळी

## महाराजांच्या चरणी अखंड भजन, अमावास्येला चंदन उटी व महाप्रसादाचा सुवर्णयोग


**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 23 )** – अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे श्रावण मास मांड (अखंड भजन) याचा शुभारंभ दिनांक 24 जुलै 2025 रोजी सकाळी 5 वाजता लहान मंदिरात ढाल बसवून, मुख्य मंदिरात महाराजांच्या गणाने, विश्वस्त मंडळ व भक्तांच्या उपस्थितीत होणार आहे.

तसेच याच दिवशी दुपारी 4.00 वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव पार पडणार आहे. या दिवशी बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी अन्नदान समितीच्या नियोजनाखाली महाप्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण मास भजन मांड कार्यक्रमासाठी दिनांक



24 जुलै ते 24 ऑगस्ट 2025 या कालावधीत अवधूत भजन मंडळांची दैनंदिन पाळी ठरवण्यात आली आहे. सहभागी मंडळांना संस्थानकडून चहा, नाश्ता, भोजन, तसेच श्रीफळ देऊन सत्कार केला जाणार आहे. नव्या मंडळांना महाराजांची गाथा भेट म्हणून दिली जाईल. प्रत्येक दिवसाला दुपारी 12 ते 1.30 व रात्री 8 ते 9.30 या वेळेत प्रसाद (भोजन) वितरण करण्यात येते. भाविकांनी प्रसाद



देणगी पावती घेऊन लाभ घ्यावा. इच्छुक अन्नदाते संस्थानशी संपर्क करून अन्नदानात सहभागी होऊ शकतात. सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष मा. श्री. पुंजारामजी नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त मंडळ ङ्क विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी यांनी केले आहे.

# अवकाळी पाऊस, डायबॅक रोगामुळे संत्रा मृग बहाराचे मोठे नुकसान

## नुकसान भरपाईसाठी वरूड तहसीलदारांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**बेनोडा ( दि. 23 )** – संत्रा मृग बहाराच्या बागांना अवकाळी पावसाचा आणि 'डायबॅक' रोगाचा जबर फटका बसला असून, अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी अखिल माकोडे यांच्या नेतृत्वात मौजा जामगांव, खडका, बारगांव, तलोटी, कुमंदरा, नागझरी, पाळसोना, बेनोडा, गोरेगांव, पांडरघाटी, मानिकपुर, माघोना,



येथील सर्व शेतकर्यांनी तहसीलदार रामदास शेळके यांना निवेदन दिले.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांनी संत्रा बागांवर झालेल्या नुकसानाची तात्काळ पाहणी करून शासन स्तरावरून आर्थिक मदत व सानुग्रह अनुदान मिळवून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अवकाळी पावसामुळे बहरलेल्या झाडांची फळधारणा कमी झाली असून, डायबॅक रोगामुळे अनेक झाडे सुकून चालली आहेत. त्यामुळे बागायती शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत. निवेदन देताना परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी अखिल माकोडे, प्रीतम गावंडे , राहुल फुले, विलास नींबुरकर, राजू जोशी, सुमित गुर्जर, विलास नागले, प्रफुल्ल गावंडे, घनश्याम सोनारे , पुरुषोत्तम पटोले, बड़ाभाऊ गोहड, धीरज बारस्कर, विनोद शिवारे, संजय गायकी, खुशाल ठाकरे,अनिल लोखंडे,आकाश माकोडे, लीलाधर बारस्कर , स्वप्निल गावंडे यांची यावेळी उपस्थिती होती.

# फायनान्स बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेवर मंथन

## अमरावती ग्रामीण पोलीस आणि बँक प्रतिनिधी यांची समन्वय बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )**– स्मॉल फायनान्स बँकांचे कर्ज वितरण आणि वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अलीकडील काळात झालेल्या लुटमार आणि जबरी चोरीच्या घटनांमुळे चिंता वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या पुढाकाराने पोलीस व बँक प्रतिनिधी यांची समन्वय बैठक 21 जुलै रोजी सायंकाळी 5 वाजता मंथन हॉल, अमरावती येथे पार पडली.

या बैठकीत जिल्ह्यात कार्यरत सुमारे 50 स्मॉल फायनान्स बँक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अलीकडील काळात ग्रामीण भागात बँक कर्मचाऱ्यांकडून कॅश वसुलीनंतर त्यांच्या वाहनावर हल्ला करून रोकड लुटण्याच्या घटना घडल्या असून, अशा घटना रोखण्यासाठी बैठक घेतल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. बैठकीत सुरक्षेसंदर्भात महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. बँक कर्मचाऱ्यांनी मोठ्या रोकडसह एकटे प्रवास टाळावा, शक्य असल्यास सुरक्षारक्षकाची नेमणूक करावी, तसेच प्रवासाची व कलेक्शनची माहिती स्थानिक पोलिसांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचना पोलिसांनी दिल्या. बँक प्रतिनिधींनीही आपल्या अडचणी, अनुभव आणि सुरक्षेवरील शंका मांडल्या. पोलिसांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली. प्रत्येक तालुक्यात पोलीस आणि बँक कर्मचाऱ्यांमध्ये थेट संपर्कासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याच्या प्रस्तावावरही चर्चा झाली.

### संवादातून सुरक्षितता – एसपी विशाल आनंद

बँकिंग क्षेत्र आणि ग्रामीण भागातील पोलिसांमध्ये सकारात्मक समन्वयाची गरज आहे. या बैठकीतून परस्पर संवादाचा पूल तयार झाला आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभाग पूर्णपणे कटिबद्ध आहे, असे मत पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी व्यक्त केले.

# विद्यार्थिनींची पोहरा प्रकल्पाला अभ्यासभेट

## शेळी व मेंढीपालनाच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा,( दि.23 )** – राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रकल्पांतर्गत पोहरा येथील प्रक्षेत्राला श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावतीच्या विद्यार्थिनींनी नुकतीच अभ्यासभेट दिली. ग्रामीण युवक व महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी चालवण्यात येणाऱ्या या प्रकल्पाची माहिती प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली होती.



विद्यार्थिनींनी प्रकल्पाचे व्यवस्थापक डॉ. बालाजी कंधारे आणि पर्यवेक्षक विश्वनाथ राऊत यांच्याशी संवाद साधला. त्यांनी प्रकल्पातील विविध घटकांची जसे की मेंढी व शेळ्यांचे संगोपन, आरोग्य तपासणी सुविधा, प्रशिक्षण शिबिर, अनुदान योजना व बाजारपेठ उपलब्धता याबद्दल सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान प्रा. मीरा ठोके, प्रा. जयश्री कडू, प्रा. प्रहेश देशमुख, प्रा. कल्पना कुऱ्हाडे आदी प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थिनींमध्ये मानसी डोंगरे, काजल बांगरे, पायल ढोके, पालक देवपारे, प्रिया राऊत, रुचिता मेंढे आदींचा समावेश होता.

विद्यार्थिनींना ग्रामीण उद्यमशिलतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, हा या भेटीमागचा उद्देश होता. या अभ्यासभेटीमुळे ग्रामीण व्यवसायातील संधी आणि अडचणी समजून घेण्यास मदत झाली, असे मत प्राचार्य डॉ. सी. एम. देशमुख यांनी व्यक्त केले.

# एमडी तस्कर जाळ्यात, 9 ग्रॅम एमडी जप्त



## गुन्हे शाखा युनिट-2 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 )** - अमरावती गुन्हे शाखा युनिट-2 ने शहरात एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांवर सलग दुसर्या कारवाईत आणखी 8.86 ग्रॅम 'मेथेड्रॉन' (एमडी) जप्त करत एकास अटक केली. या कारवाईमुळे अमरावतीतील ड्रग्ज साखळी उघडकीस आली असून पोलिसांनी याचे मूळ शोधण्याची मोहीम सुरू केली आहे.

गेल्या 20 जुलै रोजी, गुन्हे शाखेने अतीक बेग अनिस बेग (रा. तालाबपुरा) आणि मोहम्मद रिजवान अब्दुल गणी (रा. अकबर नगर) या दोघांकडून 110 ग्रॅम एमडी जप्त केली होती. चौकशीत त्यांनी हे अमलीपदार्थ सय्यद जमीर उर्फ मुज्जु सय्यद नूर (वय 22, रा. तालाबपुरा) याच्याकडून विकत घेतल्याची कबुली दिली. त्यानुसार 23 जुलै रोजी सायंकाळी 4.30 वाजता, गुन्हे शाखेच्या पथकाने वेलकम पॉईंट परिसरातून सय्यद जमीरला अटक केली. त्याच्या ताब्यातून 8.86 ग्रॅम एमडी हस्तगत करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील युनिट-2 च्या पथकाने केली. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या आदेशाने व पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, गुन्हे शाखेचे उपायुक्त रमेश धुमाळ व सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.

### शहरात ड्रग्जची साखळी ?

गेल्या काही दिवसांत एमडी ड्रग्जसंदर्भात दोन मोठे गुन्हे नोंद झाले असून, अमरावतीत या अमली पदार्थांचे जाळे सक्रिय असल्याचे स्पष्ट होत आहे. यामुळे गुन्हे शाखेने एमडी कुठून येते, कोण त्याचा वापर करतो, याच्या मुळापर्यंत जाण्याचा निर्धार केला आहे.

### अमरावतीकरांनो, सावध व्हा!

पोलीस प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, गांजा, एमडी किंवा इतर अमली पदार्थांचे सेवन किंवा विक्री कुठे होत असल्यास तातडीने गुन्हे शाखा अथवा स्थानिक पोलीस ठाण्याला माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, अशी हमीही देण्यात आली आहे.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी धो धो पाऊस

## मेळघाटात दरड कोसळली, मोर्शीत पूर, तिवस्यात रस्त्यावर पाणी ■ तर काही ठिकाणी दांडी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - जिल्ह्यातील विविध भागांत सोमवारी मध्यरात्रीपासून मंगळवारी सकाळपर्यंत पडलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. बुधवारी सुध्दा काही ठिकाणी रिमझिम तर काही ठिकाण जोरदार पाऊस बरसला. मेळघाटातील घनदाट जंगलातून जाणाऱ्या धारणी-अकोट मार्गावर दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली, तर मोर्शीत नाल्यांना पूर आल्याने नागरिकांची त्रेधा उडाली. दुसरीकडे तिवसाच्या दापोरी मार्गावर पाणी साचल्याने रस्ता पूर्ण जलमय झाला आहे. दुसरी अचलपूर शहरासह आजूबाजूच्या परिसरात पावसाने मात्र दांडी मारल्याचे पहायला मिळाले.

### कोहा-बेलकुंड मार्गावरील दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प



**चुरणी-** चिखलदरा तालुक्यातील कोहा ते बेलकुंड दरम्यानचा महत्त्वाचा मार्ग मुसळधार पावसामुळे मोठ्या धोका स्थितीत आला आहे. मंगळवारी सकाळी अचानक दरड कोसळून रस्त्यावर प्रचंड मोठा दगड आडवा पडल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. काही वेळातच दोन्ही बाजूंना वाहनांची रांग लागली आणि नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं. दरड कोसळल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी पुढाकार घेत, कोणत्याही यंत्रसामग्रीच्या मदतीशिवाय स्वत:च्या ताकदीवर रस्ता मोकळा करण्याचे काम सुरू केले. या कामात युवक, वृद्ध, महिलाही सहभागी झाले होते. जवळपास तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर मोठा दगड बाजूला हटवण्यात यश आलं आणि रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

या भागात सततच्या पावसामुळे दरड कोसळण्याचा धोका अजूनही कायम आहे. प्रशासनाने तातडीने या मार्गाची पाहणी करून आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. स्थानिकांनी वारंवार सूचना देऊनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही, ही खेदजनक बाब आहे. ग्रामस्थांनी दाखवलेली एकजूट आणि धाडस प्रेरणादायी ठरले असून, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी समाजाने एकत्र येऊन उपाययोजना केल्यास मोठा धोका टाळता येऊ शकतो, हे या घटनेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. प्रशासनाने लवकरात लवकर या मार्गावर संरक्षक भिंती, निकृष्ट माती हटवणे व नियमित देखरेख यांसारखी उपाययोजना राबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### तिवसा तालुक्यात वाहतूक ठप्प, विद्यार्थ्यांचे हाल



तिवसा तालुक्यातील दापोरी मार्गावर जोरदार पावसामुळे रस्ता पूर्णपणे जलमय झाला आहे. राजुरवाडी पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहनांची वाहतूक ठप्प झाली आहे. या मार्गावरूनच विद्यार्थ्यांचा व शेतकऱ्यांचा मुख्य संपर्क असल्याने अनेक जण अडकले आहेत. युरिया फवारणीसाठी शेतात जाणाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करून वाहतूक सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

### मोर्शीत नाल्यांना पूर, घरात पाणी



मोर्शी तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून पावसाने दांडी मारली होती. मात्र मंगळवारी दुपारी झालेल्या जोरदार पावसामुळे दमयंती व माळू नद्यांना पूर आला आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. मात्र सतत दोन तास पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील नाल्यांमधून पाणी ओसंडले आणि गुरुदेव नगरी, सिम्भोरा रोड परिसरातील अनेक घरांत पाणी घुसले. नाल्यांची वेळेवर सफाई न झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला असून नगरपरिषद प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे. अनेक भागांत रस्त्यांवर साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांचीही मोठी गैरसोय झाली. या पावसामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलपातळीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# ऑटोमध्ये झोपलेल्या तरुणाच्या गळ्यातील साखळी, ब्रासलेट लंपास!

## रेल्वे स्टेशन परिसरातील चोरीची घटना; 61 हजारांचा ऐवज गेला चोरीला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 )** - लग्न समारंभानंतर प्रवास करत असताना एका युवकाच्या गळ्यातील सोनसाखळी, बाळी, चांदीचे ब्रासलेट व मोबाईल असा सुमारे 61 हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लांबवला. ही घटना 19 जुलै रोजी अमरावती रेल्वे स्टेशन परिसरात उघड झाली. सुरेंद्र बलवंत गुवरे (रा. बोरगाव मेघे, जि. वर्धा) यांनी याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरेंद्र गुवरे हे वर्ध्याहून वलगाव येथे एका नातेवाइकाच्या लग्न समारंभासाठी आले होते. समारंभानंतर ते शेगाव येथील भावजयीच्या घरी गेले. त्यानंतर 19 जुलै रोजी सकाळी 11.30 वाजता त्यांनी अमरावती रेल्वे स्टेशन गाठण्यासाठी ऑटो घेतला. प्रवासादरम्यान झोप लागल्यामुळे, ऑटोमध्ये उपस्थित असलेल्या 20 ते 25 वयोगटातील दोन तरुणांनी सुरेंद्र यांच्या गळ्यातील 11 ग्रॅम सोनसाखळी (किंमत 44000), 1 ग्रॅम सोन्याच्या बाळ्या (5000), चांदीचे ब्रासलेट (2000) आणि मोबाईल फोन असा एकूण 61000 रुपयांचा ऐवज चोरून नेला. रेल्वे स्टेशनवर पोहोचल्यावर ऑटोचालकाने सुरेंद्र यांना उठवले. त्यानंतर भानावर आलेल्या सुरेंद्र यांना आपली साखळी, बाळी आणि मोबाईल गायब असल्याचे लक्षात आले. तत्काळ वर्ध्याला निघायची वेळ असल्याने त्यांनी 19 जुलैला तक्रार नोंदवली नाही. मात्र, नंतर 22 जुलै रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात त्यांनी तक्रार दिली. सध्या पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# वर्षभरापूर्वीची चोरी उघड

## मोबाईलसह एक अटकेत




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - बडनेरा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण (डीबी) पथकाने एका वर्षापूर्वी घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा यशस्वी छडा लावला आहे. सदर प्रकरणात आरोपीकडून 12 हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, या गुन्ह्यातील एक आरोपी अटकेत आहे.

17 जुलै 2024 रोजी प्रणव वसंतराव शिंदे (वय 37, रा. साई हेरीटेज, साईनगर, अमरावती) हे चमननगर ते अकोली रिंगरोड मार्गे जात असताना काही अनोळखी इसमांनी त्यांना अडवून मारहाण केली. तसेच त्यांच्या खिशातून 12,000 रुपये किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक माहितीचा आधार घेत तपास सुरु केला. त्यावेळी आरोपी मयुर महेंद्र पंडित (वय 21, रा. खोलापुरी गेट, भातकुली रोड, अमरावती) हा चोरून नेलेला मोबाईल वापरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीदरम्यान मयुरने कबुली दिली की, जवळपास एक वर्षापूर्वी त्याने आणि अनंता उर्फ आनंद जयदेव सिरसाठ (वय 38, व्यवसाय ङ्क मंडप डेकोरेशन, रा. खोलापुरी गेट, भातकुली रोड) यांनी मिळून जबरी चोरी केली होती. पंचासमक्ष अंगझडतीदरम्यान आरोपीकडून चोरीस गेलेला मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, आणि सहायक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण, पोलिस निरीक्षक प्रफुल गिते, पोलिस उपनिरीक्षक सचिन माकोडे, डीबी पथक इंचार्ज पोलिस हवालदार सुधीर प्रांजळे, रोशन निंसग, शशिकांत शेळके, धनराज ठाकुर, मोहम्मद समीर आणि शुभम कडूकार यांनी मोलाचे योगदान दिले.

# अवैध शस्त्रसाठ्यावर नांदगावपेठ पोलिसांची मोठी कारवाई!

## तलवारी, चाकू, खंजर, पिस्तूलसह घातक शस्त्रसाठा जप्त

### दत्तवाडीतील कारवाईने खळबळ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 ) :** शहरात वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर नांदगावपेठ पोलिसांनी केलेली मोठी कारवाई समोर आली आहे. पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने दत्तवाडी परिसरातील एका तरुणाच्या घरावर छापा टाकत तलवार, चाकू, खंजर, पिस्तूल व इतर घातक शस्त्रसाठा हस्तगत केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून दत्तवाडी देशमुख लाल परिसरातील नक्षत्र बिल्डिंग मागे राहणाऱ्या दीपेश दीपक काकडे (रा. अमरावती) यांच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला. या छाप्यात 5 तलवारी, 6 चाकू, 3 चायना चाकू, 1 पिस्तूल अशा घातक शस्त्रांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, हे शस्त्र नेमके कशासाठी वापरण्यात येणार होते, कुठल्या टोळीशी संबंधित आहेत का? याचा तपास पोलिस करत आहेत. पोलिसांनी संबंधित घराची अधिक सखोल झडती सुरूच ठेवली आहे. अवैध शस्त्रसाठा शहरात वाढत्या गुन्हेगारी टोळ्यांना पुरवला जात आहे का? याचा तपासही गंभीरपणे केला जात आहे. पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व त्यांच्या डीबी पथकाने तातडीने मिळालेल्या माहितीवर कारवाई करून संभाव्य गुन्ह्यांचा मोठा अनर्थ टाळला आहे.

### सार्वजनिक सूचना

लक्षात घ्या की आम्ही आमच्या क्लायंटच्या वतीने, कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदींनुसार समाविष्ट केलेल्या सीएमईएस ज्युपिटर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करत आहोत, १३ अ, मजला -१३, प्लॉट -४००, द पेरेग्रीन अपार्टमेंट, किस्मत सिनेमा, प्रभादेवी, मुंबई ४०००२५, महाराष्ट्र (कंपनी) येथे नोंदणीकृत कार्यालय आहे या अनुसूचीमध्ये (एकत्रितपणे मालमत्ता) अधिक विशेषतः वर्णन केलेल्या विंचोरी (यू), तालुका तिवासा, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र येथील जमिनीच्या तुकड्यांबाबत कंपनी आमच्या क्लायंटला मालमत्ता विकण्याचा मानस करते.

मालमत्तेमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागावर, आणि/किंवा फ्लोअर स्पेस इंडेक्स/फ्लोअर एरिया रेशोमध्ये कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, लाभ, आक्षेप, दावा किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्ती/संस्था, हस्तांतरणीय विकास हक्क आणि त्याच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकास क्षमता, आणि/किंवा विकास हक्क, आणि/किंवा मालमत्तेचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा आणि/किंवा मालमत्तेच्या संबंधातील कोणत्याही मालकी हक्काचा ताबा, वापर, व्यवसाय किंवा उपभोग, आणि/किंवा विकास दस्तऐवज, विक्री, हस्तांतरण, हस्तांतरण, वाटप, देवाणघेवाण, भेटवस्तू, असाइनमेंट, गहाणखत, धारणाधिकार, शुल्क, ट्रस्ट, वक्फ, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, संरक्षित भाडेपट्टा परवाना, भोगवटा हक्क, काळजीवाहू हक्क, भार, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/वसाहत, मृत्युपत्र, मृत्युपत्राचे साधन, प्रोबेट, प्रशासनाचे पत्र, सुविधा, देखभाल, विकास हक्क, संयुक्त विकास उप-विकास, प्रकल्प व्यवस्थापन, संयुक्त उपक्रम, सहकार्य, किंवा कोणत्याही न्यायालयाच्या आदेश किंवा निकाल (अंतरिम किंवा अंतिम), किंवा डिक्री अंतर्गत, किंवा कोणत्याही करार/करार अंतर्गत, किंवा अन्यथा, याद्वारे ते लेखी स्वरूपात, त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित खऱ्या प्रतींसह, योग्यरित्या नोटरी केलेल्या, अधोस्वाक्षरीकर्त्याला कळवणे आवश्यक आहे, रुणवाल आणि ओंकार एस्क्वेअर येथे, ५ वा मजला, ईस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या बाहेर, सायन चुनाभट्टी सिग्नलच्या समोर, सायन (पूर्व), मुंबई - ४०००२२, हे प्रकाशन झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत, अन्यथा अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे कथित हक्क, मालकी हक्क, व्याज, लाभ, दावा किंवा मागणी, जर असेल तर, ती माफ केली जाईल आणि/किंवा सोडून दिली जाईल असे मानले जाईल.

वरील अनुसूचीचा संदर्भ दिला आहे:
(मालमत्तेचे वर्णन)

महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यातील तिवासा तालुक्यातील विंचोरी (यू) गावात असलेले, असलेले आणि स्थित असलेले एकूण ५ हेक्टर आणि ५४ क्षेत्रफळाचे जमिनीचे सर्व तुकडे, ज्यामध्ये खालील जमिनीचे भूखंड आहेत:

(१) ४ हेक्टर, ४० एकर जमिनीचा भूखंड ज्यावर गॅट क्रमांक २/१ आहे आणि खालीलप्रमाणे सीमा आहे:
पूर्व : गट क्रमांक २८
पश्चिम : गॅट क्रमांक २/१/सी आणि २/१/डी
दक्षिण : बॅलन्स गॅट क्रमांक २/१
उत्तर : गॅट क्रमांक २/१/ई, सीएमईएस मालकीची जमीन

(२) १ हेक्टर, १४ एरीसचा जमिनीचा भूखंड ज्यावर गॅट क्रमांक २/१/ई असेल आणि खालीलप्रमाणे सीमा असेल:
पूर्व : गॅट क्रमांक २ मधील भाग जमीन
पश्चिम : गट क्रमांक २/१/बी, कोल्हे आणि २/१/सी काळे मालकीची जमीन
दक्षिण : गॅट क्रमांक २/१ सीएमईएस मालकीची जमीन
उत्तर : गट क्रमांक १५

तारीख: २४ जुलै २०२५
ठिकाण: मुंबई

एसडी/-
ॲड. अमित पवार

# राजकमलच्या रेल्वे उड्डाणपुलावर जड वाहनांना प्रवेशबंदी


## पुल शिकस्त झाल्याने निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - अमरावती शहरातील राजकलम चौक, हमालपुरा, जयस्तंभ चौक आणि रेल्वे स्टेशन चौक यांना जोडणाऱ्या अमरावती रेल्वे उड्डाणपुल अत्यंत शिकस्त झाल्याने, पुलावरील सर्व जड वाहनांसह बसेसच्या वाहतुकीवर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

**सन 1963 मध्ये झाली होती पुलाची निर्मीती**

सदर उडाणपुल सार्वजनिक बांधकाम विभागाने सन 1963 मध्ये तयार केला होता. अलीकडेच करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालात पुलाच्या स्टील गर्डर्सना गंज लागलेला असून, डेक स्लॅबमध्ये फोड, गळती आणि तडे दिसून आले आहेत. त्यामुळे पुलाचे आयुष्य संपल्याचे स्पष्ट झाले आहे.



### फक्त हलकी वाहनेच पुलावरून जाऊ शकतील

23 जुलै 2025 रोजी संध्याकाळी 8 वाजल्यापासून पुढील आदेश येईपर्यंत, सदर पुलावरून फक्त दुचाकी, ऑटो व चारचाकी कार या हलक्या वाहनांनाच प्रवेश असेल. मालवाहतूक करणारी वाहने, जड वाहने, ट्रक, मिनी डोअर, टिप्पर आणि सर्व प्रकारच्या बसेस यांना या मार्गावरून जाण्यास मनाई आहे.



### प्रशासनाची खबरदारी आणि पर्यायी मार्ग

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनेनुसार पोलिस विभागाने ही बंदी जनहितार्थ लावली आहे. हमालपुरा, बसस्थानक, जयस्तंभ चौक आणि राजकमल चौक येथून येणाऱ्या जड वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. प्रवेशबंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात मोटार वाहन कायदा 1988 व महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा वाहतूक विभागाने दिला आहे. या जुन्या पुलाचे निर्लेखन करुन नविन पूल निर्माणीचा प्रस्ताव आहे. याकरिता निधीसुध्दा मंजूर असल्याची माहिती आहे.

### नगर परिषद कार्यालय, वरुड जि. अमरावती

**ई-निविदा सुचना**

जावक क्र.1453/2025 — दि. 23/07/2025

वरुड नगर परिषदेला महाराष्ट्र शासनाकडे आवश्यक त्या वर्गात नोंदनीकृत मजूर कामगार सहकारी संस्था कडुन ई निविदा बी-1 द्विलिफाफा पध्दतीने दर मागवण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.24/07/2025 पासुन पाहण्यास उपलब्ध आहे. निविदेचा तपशिल खालिल प्रमाणे

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा प्रपत्र शुल्क | बयाना रक्कम | प्रमाण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | न.प. निधी / रस्ता निधी | | | | |
| 1) | प्रभाग 1 ते 6 मध्ये न.प. हद्दीतील नाली, रस्ता दुरुस्ती व इतर किरकोळ कामे करणे. (रु. 1,00,000/- पर्यंत) | रु. 3000/- | रु.15000/- | आवश्यकतेनुसार | 31 मार्च 2026 पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत |
| 2) | प्रभाग 7 ते 12 मध्ये न.प. हद्दीतील नाली, रस्ता दुरुस्ती व इतर किरकोळ कामे करणे. (रु. 1,00,000/- पर्यंत) | रु. 3000/- | रु.15000/- | आवश्यकतेनुसार | 31 मार्च 2026 पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत |

**ई- निविदा पध्दती तपशील**

| | |
|---|---|
| ऑनलाईन निवीदा विक्री कालावधी | दि. 24/07/2025 ते दि.01/08/2025 दु. 5.00 वाजे पर्यंत |
| ऑनलाईन निवीदा सादर कालावधी | दि. 24/07/2025 ते दि.01/08/2025 दु. 5.00 वाजे पर्यंत |
| ऑनलाईन निवीदा उघडणे (तांत्रिक) | दि. 04/08/2025 |

अटी व शर्ती :- 1) निविदे संबंधी सर्व माहिती www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद वरुड**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जामगाव परिसरातील रस्त्यांची दुरवस्था

## लाखोंचा निधी वाया, ग्रामस्थ संतप्त



**विलास पाटील**

**वरूड,( दि.23 )** – जामगाव व परिसरातील गावांमध्ये नुकतेच तयार झालेल्या रस्त्यांची अवस्था काही महिन्यांतच खराब होऊ लागली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, नागरिकांचा प्रवास धोकादायक बनला आहे. ग्रामस्थांनी या खराब कामाबाबत ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागावर ताशेरे ओढले आहेत.

ग्रामस्थांच्या मते, रस्ते बांधताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले. रोलरिंग अपुरी झाली, डांबर व खडी व्यवस्थित लावली गेली नाही. परिणामी, लाखो रुपयांचा निधी वाया गेला. या बाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### पावसात उघडे पडले पितळ

पहिल्याच पावसाळ्यात बांधकाम विभागाचे पितळ उघडे पडले आहे. रस्त्यावर पाणी साचल्यामुळे रस्ते झपाट्याने उखडत आहेत. काही भागांत तर नव्याने बांधलेला रस्ता पूर्णपणे नष्ट झाला आहे. यामुळे शालेय विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वच नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

### ग्रामस्थांचा रोष

ग्रामस्थांनी एकत्र येऊन तहसीलदार व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली आहे. जर कारवाई झाली नाही तर रास्तारोको करू, असा इशारा देत ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यांनी यामध्ये भ्रष्टाचाराची शक्यता वर्तवली आहे. उपविभागीय अभियंता चैतन्य खंडारे यांनी ठेकेदाराकडून नुकसानभरपाई घेऊन रस्ते दुरुस्त करू असे आश्वासन दिले आहे. मात्र, ग्रामस्थांना पूर्वीच्या अनुभवामुळे प्रशासनावर विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणात योग्य चौकशी व कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# त्या अपघातात एका पोलीस जवानाचा मृत्यू

- पोलिस वाहन अपघात अडकला संशयाचा भोवऱ्यात
- चांदूर रेल्वेहून निघालेले वाहन मालखेड का गेले ?





**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे/अमरावती, ( दि.23 )** – अमरावती मार्गावर बासलापुर ते चिरोडी दरम्यान पोलीसांच्या सायबर सेल, अमरावती ग्रामिण टीमच्या चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याची घटना रविवार (ता. 20) रात्री 11 वाजताच्या दरम्यान घडली. या अपघातातील जखमी मोहन अंबादास सयाम (42) रा. अमरावती यांचा उपचारादरम्यान सोमवारी रात्री 8 वाजताच्या दरम्यान अमरावती येथील खाजगी रूग्णालयात मृत्यु झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तर उर्वरित 3 जखमी पोलीस कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू आहे. या अपघातामूळे पोलीस विभागात हळहळ व्यक्त केली जात आहे, मात्र तितकाच या अपघातावर संशयही व्यक्त केला जात आहे. चांदूर रेल्वेला तपास संपवून परत येत असताना हे वाहन मालखेडमध्ये का गेले? या प्रश्नावर पोलीस विभाग अजूनही निरुत्तर आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, सायबर सेलची टीम ही चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील चोरी संदर्भातील गुन्ह्याचा मोबाईल डमडाटा काढण्याकरीता सरकारी वाहन एमएच 27 एए 0638 या वाहनाने आले होते. मग परत जात असताना हे वाहन मालखेड ला कश्याकरिता गेले?, या प्रकरणात अनेक संशयास्पद बाबी पुढे येत असून, वाहनाचा जीपीएस डेटा, वाहनाचा वेग आणि अपघात लपविण्याचा विषय चर्चेला येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या शासकीय वाहनात जीपीएस प्रणाली होती, त्यामुळे अपघातापूर्वीचा वाहनाचा मार्ग, थांबे, वेग आणि वेळेचा तपशील नोंदलेला आहे. परंतु, हा डेटा उघड केला जाईल की दडपला जाईल, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, अपघाताची माहिती एका नागरिकाने पोलिसांना थेट 112 हॉटलाईनवरून दिली, त्यामूळे अपघाताचे बिंग फुटल्याचे सुत्रांकडून सांगितले जात आहे. अपघाताला 'ओली पार्टी' तर जबाबदारी नाही ना, असे असेल तर नुसते मृतक चालकावर अपघाताची जबाबदारी निश्चित करने योग्य होईल का? आणि तसे नसेल तर हा अपघात तांत्रिक बिघाडामूळे झाल्याचे पोलीस विभागाने स्पष्ट करावे, अशी मागणी केली जात आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद सिंगूरी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली असून लवकरच सत्य बाहेर येईल.

# विनयभंग प्रकरणी आरोपीस 1 वर्ष कारावासाची शिक्षा

**चांदुर रेल्वे** – विनयभंगाच्या प्रकरणात दोषी आढळलेल्या दादाराव रामराव बावनथडे (रा. डांगरीपुरा, चांदुर रेल्वे) याला चांदुर रेल्वे येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने 1 वर्ष साध्या कारावासाची व 2000 रुपयांचा दंड, तसेच दंड न भरल्यास 1 महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरण 25 डिसेंबर 2018 रोजी रात्री 9 वाजता घडले होते. याप्रकरणी पिडीतेने चांदुर रेल्वे पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून पोलीसांनी भादंवि कलम 354 (विनयभंग) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान उपलब्ध साक्षी व पुरावे तपासून न्यायालयात चार्जशीट दाखल करण्यात आली होती. यालयाने दोन्ही पक्षांची साक्ष व युक्तिवाद ऐकून आरोपी दादाराव बावनथडे यास दोषी ठरवले. विनयभंगासारख्या गुन्ह्यांमध्ये कायद्याचा बडगा आवश्यक असून, चांदुर रेल्वे न्यायालयाच्या या निकालामुळे महिला सुरक्षेबाबत एक सकारात्मक संदेश जातो, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

# न्यूक्लिअस बजेट योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत 31 पर्यंत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 )** – धारणी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत न्यूक्लिअस बजेट योजनेचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 31 जुलै 2025 पर्यंत वाढवण्यात आली आहे. सुरुवातीला ही मुदत 15 जुलै होती, मात्र अनेक लाभार्थ्यांना अर्ज करताना अडचणी आल्यामुळे विविध संघटनांनी मुदतवाढीची मागणी केली होती. याची दखल घेत आदिवासी विकास विभागाने ही निर्णय घेतला. या योजनेत आदिवासी समाजातील शेतकरी, महिला, युवक आणि बचतगटांसाठी 85 टक्के अनुदानावर विविध योजनांचा लाभ मिळतो. यामध्ये शेतीसाठी तार कुंपण, सोलर फेन्सिंग, तुषार सिंचन संच, शिलाई मशीन, मंडप डेकोरेशन साहित्य, डीजे साऊंड सिस्टम, दालमिल, फास्ट फूड सेंटर, नळ फिटिंग, इलेक्ट्रिकल, ऑटोमोबाईल, बेकरी मशिन, संगणक संच, पॉपकॉर्न मशीन आदींचा समावेश आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना व वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 100 टक्के अनुदान देण्यात येते. अर्ज nbtribal.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहेत. अधिक माहितीसाठी प्रकल्प कार्यालयाच्या 07226-224217 या क्रमांकावर संपर्क साधावा.

## मद्यधुंद अवस्थेत पोलिस हवालदाराचा पोलिस मुख्यालयात गोंधळ!

**अमरावती** – शिस्तीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पोलिस दलातीलच एका हवालदाराने मद्यधुंद अवस्थेत पोलिस मुख्यालय परिसरात धिंगाणा घालून खळबळ उडवून दिली. ही घटना 21 जुलै रोजी सायंकाळनंतर उघडकीस आली असून, याप्रकरणी 22 जुलै रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपीचे नाव संजय गणपत मोहप असे असून, तो पोलिस हवालदार पदावर कार्यरत आहे. संजय मोहप हे पोलिस मुख्यालयाच्या परिसरातच मद्यधुंद अवस्थेत धिंगाणा घालत असताना राखीव पोलिस निरीक्षक अमरलाल सोमा उईके यांना निदर्शनास आले. त्यांनी याबाबत तातडीने गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर संजय मोहप याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, ज्यात दारूचे सेवन केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# राजुरवाडी फाट्यावर कार खड्डूयात उलटली

## तिवसा-नेरपिंगळाई रोडवरील अपघात

**महासागर प्रतिनिधी**

मोर्शी (दि. 23) – तिवसा ते नेरपिंगळाई मार्गावर असलेल्या राजुरवाडी फाट्याजवळ वळणावर कार अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्डूयात उलटली. या अपघातात कारमधील चालकासह चार युवक थोडक्यात बचावले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कारचे मोठे नुकसान झाले. ही घटना 22 जुलै रोजी पहाटे 3.30 वाजता घडली. नागपूर येथून निसर्गरम्य चिखलदरा येथे जाण्यासाठी पियुष रत्नाकर साळवे (वय 29) हे त्यांच्या तीन मित्रांसह एमएच 49 बीझेड 5531 क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारने निघाले होते. तळेगाव ङ्क तिवसा मार्गे जात असताना, राजुरवाडी गावाजवळील टर्निंगवर चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार थेट रस्त्याच्या बाजूच्या खड्डूयात कोसळली.

### क्रेनच्या सहाय्याने कार बाहेर काढली

अपघातानंतर कारमधील सर्व युवक किरकोळ जखमी झाले. लगेच अमरावती येथून क्रेन बोलवून कार बाहेर काढण्यात आली. अपघाताची नोंद शिरखेड पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

### या ठिकाणी अपघात वारंवार! चेतावणी फलक लावावा

उल्लेखनीय म्हणजे, यापूर्वी देखील याच ठिकाणी एक ट्रक पलटी झाल्याची घटना घडली होती. राजुरवाडी फाट्यावर तीन गावांना जोडणारा टर्निंग असल्यामुळे येथे सतत अपघात होत असतात. या अपघातप्रवण वळणावर धोकादायक वळण असा चेतावणी फलक लावण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सोमवारखेडा गावात अवैध दारु विक्रीवर बंदी

## ग्रामसभेचा निर्णय : कठोर कारवाईचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.23 )** – चिखलदरा तालुक्यातील सोमवारखेडा गावात अवैध रीत्या सुरू असलेली दारू विक्री थांबवण्यासाठी गावकऱ्यांनी एकजूट दाखवत ग्रामसभेत ठराव मंजूर केला आहे. या विक्रीमुळे गावातील तरुण पिढी व्यसनाधीन होत असल्याचे लक्षात घेत सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती समिती आणि महिला बचत गटांनी पुढाकार घेतला.



दि. 17 जुलै रोजी ग्रामपंचायतीत आयोजित ग्रामसभेला बीट जमादार विनोद ईसड यांनी हजेरी लावली. सभेला महिलांचा आणि नवयुवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या बैठकीत एकमताने गावात अवैध दारू आणि गुटखा विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. गावात यापुढे असे गैरकृत्य आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल आणि कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा जमादार ईसड यांनी दिला. सोमवारखेडा गावातील या निर्णयामुळे परिसरातील इतर गावांसाठीही एक सकारात्मक संदेश गेला आहे.

# ज्येष्ठ साहित्यिक, कलावंतांसाठी मानधन योजनेचे अर्ज मागविण्यात आले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** – राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेसाठी सन 2025-26 या वर्षासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र उमेदवारांनी 31 जुलै 2025 पर्यंत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना दरमहा मानधन दिले जाते. यासाठी अर्जदाराचे वय 50 वर्षांपेक्षा जास्त असावे. दिव्यांग अर्जदारांसाठी वयोमर्यादेत 10 वर्षांची सवलत आहे. कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान 15 वर्षे सातत्यपूर्ण व मोलाचे योगदान दिलेले असावे. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न 60 हजार रुपयांपेक्षा कमी असावे. विधवा, परितक्त्या, ज्येष्ठ व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जदारांनी कलेवर आधारित उपजिविका असलेली असावी किंवा सध्या कोणताही निश्चित उत्पन्नाचा स्त्रोत नसावा. महाराष्ट्राचा स्थायी रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. यात फोटो, ओळखपत्र, बँक तपशील, वय व रहिवासी दाखले, उत्पन्नाचा दाखला, कलेविषयक कामगिरीचे पुरावे, पुरस्कार प्रमाणपत्रे, कार्यक्रमांचे छायाचित्रे यांचा समावेश आहे. संपूर्ण अर्ज वेळेत व योग्य कागदपत्रांसह सादर करावा, म्हणजे पात्र व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळू शकेल, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# औषधी गुणधर्म असलेल्या कंटोली, कार्टूलीसह रानभाज्यांची बाजारात एंट्री

## खवय्यांची भाजी खरेदीसाठी झुंबड








**नितीन दुर्बडे**

**पथ्रोट, ( दि. 23 ) :** लांबलेल्या पावसामुळे बाजारातील पारंपरिक भाज्या महाग झाल्याने सर्वसामान्य शाकाहारी कुटुंबांचे बजेट कोलमडले होते. शाकाहारी अन्नाला चव देणाऱ्या भाज्यांचे दर वाढल्याने शाकाहाराची चवच हरवली होती. मात्र आता कंटोली, कार्टूली, तरोटा, बांबूचे कोंब, वाघोटे यांसारख्या औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्यांनी बाजारपेठांत हजेरी लावल्यानं खवय्यांना हायसे वाटले आहे.

अचलपूर व चिखलदरा तालुक्यातील डोंगराळ व जंगल भागांतून ग्रामीण महिला सकाळपासूनच रानात जाऊन य ा भाज्या वेचतात. नंतर त्या बाजारात आणून विक्री करतात. दिवसाला सरासरी 400 ते 500 रुपये उत्पन्न मिळत असल्याने या भाज्यांचे संकलन ग्रामीण महिलांसाठी रोजगाराचे साधनही बनले आहे.

विशेष म्हणजे, वर्षात फक्त दोन महिने उपलब्ध होणाऱ्या या भाज्यांमध्ये मोठी औषधी क्षमता असून त्या शरीरासाठी उपयुक्त ठरतात. पावसाळा सुरू झाला की आठवड्याभरात या रानभाज्या बाजारात दाखल होतात.

या रानभाज्यांचा आस्वाद घेण्यासाठी गरीब ते श्रीमंत वर्गातील लोक आवर्जून खरेदी करतात. शाकाहारींसोबतच मांसाहारी व्यक्तीदेखील या भाज्यांना पसंती देतात.

### जेवणात रानभाजीचा हमखास समावेश

गावागावांत याबाबत माहिती असल्याने अनेक कुटुंबांमध्ये पावसाळी जेवणात रानभाजीचा समावेश हमखास असतो. वयोवृद्ध मंडळी तर वर्षातून एकदा तरी या भाज्या खाण्यासाठी आग्रही असतात, कारण त्यांच्या मते या भाज्या पचन, रक्तशुद्धी, त्वचारोग, सांधेदुखी यांसारख्या विकारांवर गुणकारी असतात.डॉक्टर आणि आहारतज्ज्ञ सुद्धा ऋतूनुसार नैसर्गिक अन्न व भाज्यांचा समावेश करण्याचा सल्ला देतात. त्यामुळेच आजच्या धावपळीच्या युगातही गावठी, नैसर्गिक पद्धतीने उगवणाऱ्या भाज्यांची मागणी वाढत आहे. पावसाळा म्हणजेच रानभाज्यांचा राजा काळ! असं म्हणणारे खवय्ये या भाज्यांचा आस्वाद घेण्यासाठी बाजारात गर्दी करत आहेत. हे भाज्यांचे संकलन आणि विक्री म्हणजे केवळ रोजगाराचं साधन नसून, परंपरेतील आरोग्यदायी खाद्यसंस्कृतीचं पुनरुज्जीवनही आहे.

# सोनारखेडा येथे अवैध रेती वाहतुकीचा पर्दाफाश

## 5.04 लाखांचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली, ( दि.23 )**– तालुक्यातील सोनारखेडा येथील नदीपात्रामध्ये सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकीचा पर्दाफाश करण्यात आला असून, या कारवाईत 5 लाख 4 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई भातकुलीचे तहसीलदार डॉ. अजितकुमार येळे यांच्या नेतृत्वाखाली 22 मे रोजी रात्री करण्यात आली.

तहसीलदार येळे यांना 21 जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली होती की सोनारखेडा परिसरातील नदीपात्रातून अवैध रेती वाहतूक सुरू आहे. यानंतर त्यांनी तलाठी गिल, बेले व निरगुळे यांच्यासह घटनास्थळी तातडीने धाव घेतली. रात्री 10 वाजताच्या सुमारास सोनारखेडा वाठोडा मार्गे पोहोचल्यावर, त्यांनी नदीपात्रात महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर व ट्रॉली रेतीसह वाहतूक करताना पाहिला. शासकीय वाहनांची चाहूल लागताच ट्रॅक्टरचालकाने वाहन शेतात लपवून पळ काढला. त्यानंतर पोलिस स्टेशन खोलापुर येथे बंदोबस्त मागवून अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. पोलिस पाटील सुनील मातकर यांचाही यात सहभाग होता. थोड्यावेळाने घटनास्थळी जुबेर खा उस्मान खा (रा. धामोरी) हा युवक आला व ट्रॅक्टर त्याच्या मालकीचा असल्याचे सांगितले. मात्र त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे नव्हती. त्याने हे वाहन एक महिन्यापूर्वी खरेदी केल्याचे सांगितले आणि स्वतः ते ट्रॅक्टर खोलापुर पोलिस ठाण्यात जमा केले. पुढील चौकशीत जुबेर खा याने सांगितले की अजय कोलवडे (रा. वाठोडा शुक्लेश्वर) याच्याकडे त्याने वाहन चालविण्यास दिले होते. त्यामुळे दोघांविरोधात भादंवि कलम 379, 34, तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 9, 15, खनिज अधिनियम 1957 अंतर्गत कलम 3, 4, 21, आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम 1984 चे कलम 3 व 7 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत ट्रॅक्टर व त्यातील रेती असा एकूण 5.04 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास खोलापुर पोलिस स्टेशनमार्फत सुरू आहे.

